महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,
नागपूर विभागीय मंडळ, सिव्हिल लाईन्स, नागपूर-४४० ००
e-mail:- msboardnagpur@gmail.com www.nagpureduboard.in

पत्र क. : नाविमं / प.उ.मा. / १४७
नागपूर, दिनांक :१३/०१/२०२५

प्रति,

मुख्याध्यापक / प्राचार्य
सर्व मान्यताप्राप्त कनिष्ठ महाविद्यालय,
नागपूर विभाग, नागपूर.
(भंडारा,चंद्रपूर,नागपूर,वर्धा,गडचिरोली,गोंदिया)

विषय :—फेब्रु. / मार्च—२०२५ मध्ये घेण्यात येणाऱ्या माध्यमिक शालांत प्रमाणपत्र (इ.१०वी) व उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२वी) परीक्षेस प्रविष्ठ होणाऱ्या विद्यार्थ्यांचे हजेरी क्षमापित करणे, आवेदनपत्र रद्दकरणेबाबत विद्यार्थ्यांचे प्रस्ताव मंडळ कार्यालयास सादर करण्याबाबत.

संदर्भ :— राज्य मंडळ, पुणे यांचे पत्र क्र. / परीक्षा—4 / ४८६४, दिनांक १८/१२/२०२४

**१. विभागीय मंडळाकडून उपस्थितीबाबत तूट क्षमापित करणेबाबत.**

नियमित विद्यार्थ्यांची प्रथम व द्वितीय सत्रातील हजेरी स्वतंत्रपणे 75 टक्के भरणे आवश्यक आहे. उपस्थितीची गणना प्रथम सत्र कनिष्ठ महाविद्यालय सुरू झाल्यापासून 15 ऑक्टोबर पर्यंत व दुसरे सत्र 16 ऑक्टोबर पासून 31 जानेवारी पर्यंत धरण्यात यावी ज्या विद्यार्थ्यांची हजेरी दोन्ही सत्रात स्वातंत्रपणे सरासरी 60 ते 75 टक्यांच्या दरम्यान आहे. अशा विद्यार्थ्यांची हजेरी क्षमापित करण्याचा अधिकार विभागीय अध्यक्षांना आहे.

**२. राज्य मंडळाकडून उपस्थितीतील तूट क्षमापित करणेबाबत.**

ज्या नियमित विद्यार्थ्यांची उपस्थिती प्रथम व द्वितीय सत्रांत स्वतंत्रपणे अथवा अपवादात्मक प्रकरणी दोन्ही सत्रात स्वतंत्रपणे 50 टक्के पेक्षा जास्त परंतू 60 टक्के पेक्षा कमी आहे आणि त्रुटीचे कारण 1) विद्यार्थ्यांचा प्रलंबित आजार 2) विद्यार्थ्यांच्या आई—वडीलांचे आकस्मिक निधन 3) अनपेक्षित कारणामुळे विद्यार्थ्यांस बऱ्याच कालावधीसाठी परगावी / परदेशी जाणे भाग पाडणे 4) नैसर्गिक आपत्ती 5) ज्या खेरीज अन्य रास्त व योग्य कारण असल्यास अशा कारणांच्या सबळ पुराव्यासह (दाखला प्रमाणपत्र) सत्रवार हजेरीतील तफावतीची नोंद करून प्रस्ताव पाठवावेत. प्रत्येक विद्यार्थ्यांचे स्वतंत्र परिशिष्ट दयावे. प्रत्येक प्रकरणाची छाननी करून विभागीय अध्यक्षांच्या शिफारशीसह प्रस्ताव मा. अध्यक्ष, राज्य मंडळ, पुणे यांचेकडे अंतिम निर्णयासाठी पाठविण्यात येतील. याबाबत राज्य मंडळाचा निर्णय अंतिम व बंधनकारक राहील.

**३. आवेदनपत्र रद्द करणेबाबत.**

ज्या नियमित विद्यार्थ्यांची हजेरी दोन्ही सत्रात स्वतंत्रपणे 75 टक्के भरत नाही व ज्या विद्यार्थ्यांची हजेरी 50 टक्के ते 60 टक्केच्या दरम्यानची आहे. अशा विद्यार्थ्यांची हजेरी क्षमापित करण्यासाठी आपणास शिफारस करावयाची नाही. तसेच त्यामुळे आवेदनपत्र रद्द करावयाचे आहे असे प्रस्ताव व ज्या विद्यार्थ्यांची हजेरी दोन्ही सत्रात स्वतंत्रपणे अगर एका सत्रात 50 टक्के पेक्षा कमी आहे. अशा विद्यार्थ्यांचे प्रस्ताव आवेदनपत्र रद्द करण्यासाठी विहित तक्त्यात एकत्रितरित्या आपल्या शिफारशीने 03 फेब्रुवारी 2025 पर्यंत या विभागीय मंडळास प्राप्त होतील अशा बेताने सादर करावेत. **हजेरी कमी या कारणाखेरीज अन्य करणास्तव आवेदनपत्र रद्द केले जाणार नाहीत तसेच उपरोक्त बाबत फेरप्रस्ताव कोणत्याही परिस्थितीत स्विकारले जाणार नाहीत याची नोंद घ्यावी. आवश्यकतेनूसार मंडळाकडून मुळ अभिलेखाची मागणी करण्यात येईल. त्यावेळी ते सादर करावेत. तसेच दिनांक 03 फेब्रुवारी 2025 नंतर सादर करण्यात येणाऱ्या प्रस्तावाला विद्यार्थ्यांचे नैसर्गिक आपत्तीचे कारण वगळता इतर कारणांसाठी प्रति विद्यार्थी प्रशासकीय शुल्क रू. 1000 / — आकारण्यात येतील याची नोंद घ्यावी.**

(चिंतामण वंजारी)
विभागीय सचिव,
नागपूर विभागीय मंडळ, नागपूर

प्रतिलिपी :—

1) मा. सचिव,राज्य मंडळ, पुणे यांना संदर्भिय पत्राचे अनुषंगाने माहितीस्तव समादराने अग्रेषित.
2) मा. शिक्षण उपसंचालक नागपूर, विभाग नागपूर यांना माहितीस्तव व उचित कार्यवाहीस्तव समादराने अग्रेषित.

## प्रपत्र अ

### माध्यमिक व उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षा फेब्रु./ मार्च २०२५
### नियमित विद्यार्थ्यांची उपस्थिती क्षमापित करणेबाबत.......

शाळा/ क. म.वि चे नाव ........................................................................................ सांकेतिक क्रमांक .............

| अ.क्र. | विद्यार्थ्याचे नाव | आवेदनपत्र अ.क्र. | प्रथम सत्र<br>जुन २०२४ मध्ये विद्यावर्ष सुरू झाल्याच्या तारखेपासून १५ ऑक्टोबर २०२४ पर्यंत | | | द्वितीय सत्र<br>दि. १६ ऑक्टोबर २०२४ पासून ३१ जानेवारी २०२५ पर्यंत | | | दोन्ही सत्रातील एकुण टक्केवारी | एकूण ७५ टक्के हजेरी होण्यास कमी पडणारे दिवस | हजेरी कमी पडण्याचे कारण | कमी असलेली हजेरी क्षमापित करण्याबाबतची स्पष्ट शिफारस |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | विद्यालयीन कामाचे एकूण दिवस | विद्यार्थ्याचे उपस्थितीचे एकूण दिवस | टक्केवारी | विद्यालयीन कामाचे एकूण दिवस | विद्यार्थ्याचे उपस्थितीचे एकूण दिवस | टक्केवारी | | | | |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ | १२ | १३ |
| | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | |

मुख्याध्यापक/ प्राचार्य सही व शिक्का

कार्यालयीन उपयोगासाठी

क्षमापित केलेली प्रकरणे –

लिपीक   शा. प्र.   शा. अ.   वि.सहा.सचिव/सहसचिव   मा. विभागीय सचिव   मा. विभागीय अध्यक्ष

## प्रपत्र ब

### माध्यमिक व उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षा फेब्रु./मार्च २०२५
### नियमित विद्यार्थ्यांची उपस्थिती क्षमापित न (Withdraw) करणेबाबत.....

शाळा/ क. म.वि चे नाव ........................................................................................ सांकेतिक क्रमांक .............

| अ.क्र. | विद्यार्थ्याचे नाव | आवेदनपत्र अ.क्र. | प्रथम सत्र — जुन २०२४ मध्ये शैक्षणिक वर्ष सुरू झाल्याच्या तारखेपासून १५ ऑक्टोबर २०२४ पर्यंत | | | द्वितीय सत्र — दि. १६ ऑक्टोबर २०२४ पासून ३१ जानेवारी २०२५ पर्यंत | | | दोन्ही सत्रातील एकुण टक्केवारी | एकूण ७५ टक्के हजेरी होण्यास कमी पडणारे दिवस | हजेरी कमी पडण्याचे कारण | कमी असलेली हजेरी क्षमापित न करण्याबाबतची स्पष्ट शिफारस |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | विद्यालयीन कामाचे एकूण दिवस | विद्यार्थ्याचे उपस्थितीचे एकूण दिवस | टक्केवारी | विद्यालयीन कामाचे एकूण दिवस | विद्यार्थ्याचे उपस्थितीचे एकूण दिवस | टक्केवारी | | | | |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ | १२ | १३ |
| | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | |

सूचना :– आवेदन पत्र मागे घेणे आहे, अशाच विद्यार्थ्याचे नावाची माहिती सदर तक्त्यामध्ये भरावी.

मुख्याध्यापक/ प्राचार्य सही व शिक्का

कार्यालयीन उपयोगासाठी

लिपीक | शा. प्र. | शा. अ. | वि.सहा.सचिव/सहसचिव | मा. विभागीय सचिव | मा. विभागीय अध्यक्ष